# ग्रंथालय विभागाकडून

१. समर्पक मलपृष्ठे - श्री. मारुती बोडके, प्रभारी ग्रंथपाल ... २४

२. संशोधनकार्यात ग्रंथपालाची भूमिका - श्री. प्रविण घुले, सहाय्यक ग्रंथपाल ... ३२

विभागीय संपादक

**प्रा. डॉ. विजय बाणकर**

**New laws for Librarianship**

1. Libraries serves humanity.
2. Respect all forms by which knowledge is communicated.
3. Use technology intelligently to enhance service.
4. Protect free access to knowledge.
5. Honour the past & create the future.

# समर्पक मलपृष्ठे

श्री. मारुती बोडके
प्रभारी ग्रंथपाल

महाविद्यालयीन ग्रंथालयात विविध प्रकारची शेकडो / हजारो पुस्तके असतात. सर्वच्या सर्व काही कुणी वाचीत नाही; वाचूही शकत नाही. पण ग्रंथालयात काम करताना मात्र जवळ जवळ प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ नक्कीच पाहिले / वाचले जाते. काही पुस्तकांची मलपृष्ठे केवळ माहितीवजा असतात तर काही विचार करावयास भाग पाडणारी असतात. अशी मलपृष्ठे, ती पुस्तके वाचल्यानंतर समर्पक आहेत, अशी खात्री पटते. अर्थातच, अशी पुस्तके व त्यातील विचार संग्राह्य व/वा सन्मार्गदर्शक ठरतात. ग्रंथपाल किंवा ग्रंथालयातील एक कर्मचारी म्हणून अशा पुस्तकांबद्दल वाचकांना आवर्जून सांगावेसे वाटते, सांगतोही. पुस्तकांकडे नेणारी निदान 'मलपृष्ठ तरी वाचून पहा' ही परिणामकारक कल्पना अधिकाधिक विद्यार्थी-वाचकांप्रत पोचावी, त्यांना विविधतायुक्त, व्यापक, विशाल पुस्तक विश्वाची प्राथमिक ओळख व्हावी, हा अनेक वर्षांपासून मनात रेंगाळत असलेला विचार संकलन स्वरूप या लेखामधून आपल्या 'अगस्त्य' नियतकालिकाद्वारे सादर करीत आहे.

'ग्रंथ हे गूरूच' आणि 'जो जो जयाचा घेतला मी गुण । तो तो गुरू केला मी जाण । गुरूसी आले अपारपण । जग संपूर्ण गरू दिसे ।।' ही श्रीएकनाथी भागवतातील ओवी 'समर्पक मलपृष्ठे' या शीर्षकाच्या लेखासही लागू पडते. उदाहरणे म्हणून काही पुस्तकांच्या मलपृष्ठावरील विचार / विचारांश इथे उद्धृत व संग्रहीत केले आहेत.

... १ ...

'नर आणि मादी' या खेरीजही स्त्री-पुरूष नात्याचे किती लोभस फुलोरे आहेत. स्त्रियांना 'मुक्ती' हवी असली, तरी पुरूषविरहित जगात का रहायचं आहे ? स्त्रीविरहीत जगाची कल्पना पुरूषांनाही अशक्य आहे. मग तरीही 'स्त्री विरूध्द पुरूष' हा संघर्ष कशासाठी ? खरंच का हा संघर्ष अटळ आहे ?

हे पुस्तक, अशा अनेक प्रश्नांवर विचार करण्यासाठी तुम्हाला निश्चित उद्युक्त करील. आणि होय, पुस्तक वाचण्यापूर्वीचे तुम्ही आणि नंतरचे तुम्ही 'सारखे'नसाल...

### स्त्री विरूध्द पुरूष

शिवराज गोर्ले, सहलेखिका : जयश्री रावळेकर
राजहंस प्रकाशन / पुण

... २ ...

अधिकाधिक उपभोगांच्या हव्यासामुळे एका विचित्र वळणावर मानवजात येऊन ठेपली आहे. आता आपल्या सर्वांपुढे केवळ दोनच पर्याय उरले आहेत. नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करणाऱ्या आजवरच्या या आत्मघातकी मार्गावर हताशपणे वाटचाल करायची किंवा परत मागे फिरून कार्व्हरने दाखविलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धन-विकास-उपयोग-पुनर्भरण या शाश्वत कृषिसंस्कृतीचा स्वीकार करायचा.

भावी पिढ्यांच्या सुखसमृध्दीचा पाया घालायचा असेल तर प्रत्येक सुजाण नागरिकाने वाचायलाच हवे असे पुस्तक 'एक होता कार्व्हर'.

### एक होता कार्व्हर

वीणा गव्हाणकर
राजहंस प्रकाशन, पुणे

... ३ ...

आई आणि मुलांमधला रक्तबंध आदिम ........... शरीराने आणि मनानेही काळजाशी घट्ट बांधलेला !

सुंदर, निरामय, जीवनमूल्यांना पैशाच्या दाव्याशी बांधून मानवी नात्यांमधला प्राणच शोषू पाहणाऱ्या आधुनिक अर्थसत्तेने आई-मुलांच्या नात्याला नवं परिमाण दिलं आहे ..... हादरे आणि आव्हानही दिलं आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या ख्यातनाम लेखिका शोभा डे यांनी आधुनिकतेच्या झंझावातात जगणाऱ्या आपल्या सहा मुलांना लिहिलेली ही पत्रं .... जगातल्या कुठल्याही आईला तिचीच वाटतील अशी ! गोंधळून टाकणाऱ्या जीवघेण्या स्पर्धेत लोटून उद्ध्वस्त करणाऱ्या दुनियेशी टक्कर देणं अपरिहार्यच बनलेल्या आपल्या मुलांसाठी कुणाही आईच काळीज तुटावं, अशा प्रत्येक विषयाची चर्चा या पत्रांमध्ये आहे. कुटुंबाची चौकट, परस्परांमधल्या नात्याचे बंध, कौटुंबिक संस्कृती परंपरा आणि नीतीमूल्यांचा आग्रह.... कठोर शिस्त आणि सारंच झुगारून देणारी बंडखोरी... तासन् तास चालणारे टेलिफोन कॉल्स आणि लठ्ठ बिलांवरून घरात होणाऱ्या हाणामाऱ्या.... मध्यरात्रीपर्यंत चालणाऱ्या पार्ट्या आणि इंटरनेटवरचं चॅटींग....

वयात येतानाच्या काळज्या, कोवळ्या वयातलं प्रेम,

झपाटून टाकणारं शारीरिक आकर्षण मैत्रीची नाजुक गुंतागुंत.... जोडीदाराची निवड आणि शारीरिक संबंधांचा तिढा ! देश... देव... धर्म... सामाजिक जबाबदाऱ्या आणि नागरिकत्वाचं भान ! असे किती विषय ! कितीतरी प्रसंग !!

अपरंपार प्रेमाने ओथंबलेली, मायेने जवळ घेणारी, कधी पाठीत धपाटे घालणारी, चिडवणारी, टिंगल करणारी तर कधी धारेवर धरणारी, मनसोक्त हसवणारी आणि हसता हसता अचानक डोळ्यात पाणी उभं करणारी ही सुंदर पत्रं.... 'जगण्या'साठी आसुसलेल्या प्रत्येक मनाला स्पर्शून जातील .

**स्पीडपोस्ट**

शोभा डे, अनुवाद : अपर्णा वेलनकर

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

... ४ ...

'इसवीसन २०२० पर्यंत किंवा जमल्यास त्याच्याही आधी प्रगत भारत उभा करणे हे हस्तिदंती मनोऱ्यात बसून चित्तारलेले मिथ्या स्वप्न नव्हे किंवा केवळ आशावादही नव्हे. खरे तर, ही अथक परिश्रमाची मागणी करणारी आणि अव्याहत चालणारी मोहीम आहे. आपण सारे त्यात मनापासून सहभागी होण्याचा अवकाश ... मोहीम यशस्वी झालीच म्हणून समजा !' - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

**भारत २०२० (नव्या सहस्त्रकाचा शोध)**

मूळ लेखक : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम,

अनुवाद : अभय सदावर्ते

राजहंस प्रकाशन, पुणे

... ५ ...

'व्हेन अ गांधी डाईज, नोबडी इज् सेफ'.

**इन्हेलिंग दि महात्मा**

ख्रिस्तोफर क्रेमर

कार्पर कॉलिन्स पब्लिशर्स, इंडिया

... ६ ...

पाहिलंस, मिलिंद, माणूस अंतर्मुख होण्याला केवढा भितो ते ? दुसऱ्याच्या दु:खाकडे तो निर्विकारपणे पाहू शकतो. त्याच्या दु:खाची छाननी करू शकतो; पण स्वत:चं परीक्षण करताना मात्र तो व्याकूळ होतो. दुसऱ्याच्या जखमेवरची पट्टी चार चौघांत त्याला बेदरकारपणे काढता येते; पण स्वत:च्या जखमेवरची पट्टी दूर करण्याच्या कल्पनेनंही तो कासावीस होतो....

याचं कारण ?

'कारण एकच ......... जीवनावरची अश्रध्दा. जीवन जगण्यात असलेला प्रामाणिकपणाचा अभाव. सारेच व्यवहार स्वार्थप्रेरित. मानव एकटाच जन्माला येतो आणि त्याला शेवटी एकटंच जावं लागतं, तरीही त्याला आयुष्यभर सोबतीची आवश्यकता असते. ही सोबत तो शोधीत असतो. आयुष्य क्षणभंगुर आहे, हे माहीत असूनही, चिरंतन, शाश्वत प्रेमाचं ठिकाण त्याला हवं असतं, पण हे सारं स्वत:ला सुरक्षित राखून ....'

'दिल्याखेरीज काहीच मिळू शकत नाही. स्वत: हरवल्याखेरीज काहीच गवसत नाही. हे हरवणं जो शिकला, त्यालाच ती शांती, ते समाधान मिळू शकेल. मात्र ते ठिकाण प्रत्येकानं शोधायला हवं....'

**प्रतिक्षा**

रणजित देसाई

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

... ७ ...

विपश्यना इज् वन ऑफ इंडियाज् मोस्ट एन्शंट टेक्निक्स ऑफ मेडिटेशन. 2500 यिअर्स ॲगो इट वॉज रि-डिस्कव्हर्ड बाय द गौतम दि बुध्द अँड टॉट बाय हिम ॲज् अ युनिव्हर्सल रेमेडी फॉर यूनिव्हर्सल इल्स. ... विपश्यना इज् अ पाली वर्ड मीनिंग इन्साईट, सीईंग थिंग्ज ॲज दे रीअली आर. इट इज् नॉट व ब्लाईंड फेथ ऑर फिलॉसॉफी, ॲण्ड हॅज नथिंग टू डू विथ सेक्टेरिअन रिलीजन इन्स्टीड विपश्यना इज अ प्रॅक्टिकल मेथड दॅट कॅन बी ॲप्लाईड बाय ॲनीवन ऑफ ॲव्हरेज इन्टेलिजन्स. इट्स गोल इज् टू प्युरिफाय दि माईंड,टू इलिमिनेट दि टेन्शन्स ॲण्ड निगेटिव्हिटीज दॅट मेक अस मिझरेबल ...

'दि आर्ट ऑफ लिव्हिंग' इज् दि फर्स्ट टू ॲपिअर इन इंग्लिश दॅट ॲक्युरेटली डिस्क्राईब्ज् ॲट लेंग्थ, फॉर दि जनरल रीडर ...

**दि आर्ट ऑफ लिव्हिंग :**

विपश्यना मेडिटेशन ॲज टॉट बाय एस्. एन्. गोएंका

लेखक : विल्यम हार्ट

एम्बसी बूक डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई

... ८ ...

सद्दाम हुसेन याने हुकूमशाही गाजवून हजारो लोकांना यमसदनास पाठवले आणि बहुसंख्य लोकांचे जीवन बरबाद केले. तसेच अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी सर्व जगाचे आपण कोतवाल आहोत असे मानून इराकची राखरांगोळी केली. त्याचा हा थोडक्यात लिहिलेला इतिहास आहे.

**इराक दहन**

गोविंद तळवळकर

मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

… ९ …

परीक्षेतलं यश, परीक्षेतलं अपयश म्हणजेच केवळ आयुष्यातील अंतिम ध्येय नाही ; जगण्याचं शिखर त्यापुढे आहे. केवळ अन्नच नाही, आयुष्यही शिजत ठेवावं लागतं. कण न् कण उकळत ठेवावा लागतो. तेव्हा कुठे तरी जीवनाला चव येते ! चला तर करू या - त्या 'चव'दार आयुष्याचं स्वागत ! हात मिलाओ - अगदी घट्ट - प्रचंड निश्चयाचा ! नव्या गतीने, पुढच्या शिखराकडे निघण्याचा ! वाटेतला एखादा काटाही पचवण्याचा नव्या कळीला फूल होण्याचे निमंत्रण देण्याचा !

**वय : वादळविजांचं !**

प्रवीण दवणे,

नवचैतन्य प्रकाशन, मुंबई

… १० …

भारतातील सध्याची शिक्षणव्यवस्था परिवर्तनाच्या आड येत आहे. उच्च वर्णियांनी आणि आर्थिक व राजकीय सत्ताधाऱ्यांनी या शिक्षणव्यवस्थेला वेठीला धरले आहे. त्यातच त्यांचे हित व लाभ आहे. त्यामुळेच, एकीकडे खाजगी संस्थांनी मांडलेला शिक्षणाचा बाजार आणि दुसरीकडे शिक्षणाचे सरकारीकरण या विसंगत गोष्टी आज सर्रास दिसत आहेत. ..... आणि सार्वत्रिक शिक्षणाचा संकल्प दूर दूर जात आहे.

पूर्ण उद्‌ध्वस्ततेकडे जाणाऱ्या आजच्या शिक्षणव्यवस्थेचं हे चित्र; मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. राम जोशी यांनी या चित्राच्या कृष्णधवल छटा इथे चितारल्या आहेत.

वाचता वाचता अंतर्मुख करणारा सद्यकालीन महत्त्वाच्या प्रश्नावरील अभ्यासप्रचुर चिंतनीय ग्रंथ.

**शिक्षण-चित्र**

प्रा. राम जोशी

ग्रंथाली, मुंबई

… ११ …

ऋग्वेदातील ऋचा रचल्या गेल्या त्या अफगाणिस्तानातील अमू नदीच्या काठी. पारश्यांचा धर्मग्रंथ अवेस्ता हा देखील झरतुष्ट्राने इथेच लिहिला. त्यानंतर इथे पर्वत पहाडांच्या दऱ्याखोऱ्यातून 'बुध्दं सरणं गच्छामि'चे सूर निनादले. आज त्याच प्रदेशात अल काईदाचे वेगळ्याच प्रकारचे साहित्य सापडले आहे. सर्व तऱ्हेची विध्वसंक कृत्ये करण्याचे पध्दतशीर शिक्षण देणारे साहित्य....

....१९७९ च्या अखेरीस रशियन सैन्य अफगाणिस्तानात घुसले. ..... त्यानंतर २४ वर्षांच्या युध्दामुळे पूर्णपणे पिळवटून निघालेले भांबावलेले, संतापलेले सर्वसामान्य अफगाण भविष्याकडे आशेने नजर लावून बसलेले आहेत. पण तिथे .......... शांतता नांदू नये म्हणून प्रयत्न करणाऱ्या अंतर्गत शक्ती आहेत, बाहेरच्याही शक्ती आहेत. जर तिथे शांतता स्थापन झाली नाही, तर पुन: एकदा युध्दाचा भडका उडणार आहे. एका बाजूला जगातील इस्लामेतर शक्ती आणि सत्तांचा विध्वंस करायला सज्ज झालेला दहशतवाद आहे; तर दुसऱ्या बाजूला जगावर निरंकुश सत्ता गाजवायला सिध्द झालेल्या पाश्चात्य साम्राज्यवादाचा म्होरक्या - बलिष्ठ अमेरिका आहे. या जात्यात आज अफगाणिस्तान भरडून निघाला आहे, तर इतर देश सुपात आहेत. इतिहासाच्या या स्तिमित करणाऱ्या वाटचालीचा वेध घेणारे पुस्तक.

**अफगाण डायरी : काल आणि आज**

प्रतिभा रानडे

राजहंस प्रकाशन, पुणे

… १२ …

'माऊली' ही अगदी वेगळी कादंबरी. तिची नायिका आहे एक मांजरी; लेखकाने माया लावलेली. या मायेच्या पसाऱ्यात लेखकाचे कुटुंबीय, स्नेही-सोबती आणि त्या क्रूर काळ्या बोक्यासह मांजरीचा गोतावळाही समाविष्ट होतो आणि या कादंबरीची वीण एक वेगळं रंगरूप घेऊ लागते.

यादवांचे निरीक्षण वाचकाला सिमीत करील असे आहे... साधा वाटेल अशा तपशिलाची पेरणी करीत लेखक स्वरक्षण आणि स्ववंशवर्धन या दोन मजबूज पाख्यांवर विसावलेल्या निसर्गसिध्द आदिम प्रेरणेशी वाचकाला नेऊन भिडवतो तेव्हा वाचक पछाडल्यागत होतो. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांच्याच फक्त अंकित असलेले एक थेट असे नर-मादीच्या नात्याचे अस्तित्व न्याहाळताना आदिनिरणाच्या वाटेकडे वळतो.

मग मांजरी ही मांजरी राहत नाही; तिथे साकारत जाते आदिमायेचे- त्या जगन्माऊलीचे आत्मजन्मा नि आत्मभोगी असे कृतार्थ रूपडे. चिंतनगर्भ जीवनेच्छेचा कलारूप आविष्कार म्हणजे 'माऊली'

दार्शनिकतत्त्वज्ञान, लोकसाहित्य - परंपरा, सनातन भारतीय समाजमन यांचा हळुवार आणि तलम स्पर्श झालेली मराठी भाषेतील ही पहिलीच साहित्यकृती असावी, इतकी ती वेगळी आहे.

**माऊली**

आनंद यादव

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

... १३ ...

काळ जातच असतो. सणवार येतात आणि जातात. आपण सगळे आपल्या चाकोरीत फिरता फिरता थकत जाणारे. ऋतूंचे बदल आपल्या लक्षात येत नाहीत, की रोज माथ्यावर उगवणाऱ्या चंद्राच्या बदलत्या कळा आपण पहात सुध्दा नाही. कधी कधी मात्र पुष्कळ वेगळंही होतं. एखादं चित्र, एखादं पुस्तक, एखादं दृश्य एवढं सुध्दा या वेगळेपणासाठी पुरेसं असतं. अशा एखाद्या निमित्तानं मन चाकोरीबाहेर येतं. घडून गेलेलं अन् घडत असलेलं केवढं तरी मग भोवती जागं होऊ लागतं. मनातही नवंच काही जागतं. जणू अरूपाला रूप येतं. त्या रूपाचाच हा उत्सव !

**रूपोत्सव**

अरूणा ढेरे

सुरेश एजन्सी, पुणे

... १४ ...

हामी जेबी हाव त्ये हिथलेच हाव
हामच्या खेड्याला तोड नाही
हामच्या सोसन्याला तोड नाही
कदी का हुईना कसं का हुईना
एक ना एक दिवस असा येईल
तुमी समदे हात जोडून
कमरत झुकत खेड्याकडं याल
खेडयाकडं याल

**शेतकरी**

फ. म. शहाजिंदे

भूमी प्रकाशन, लातूर

... १५ ...

प्रिय शशिकांत,

तुझा अनुभव सच्चा आहे. तू ज्या खेड्यामधल्या शेतीची, शेतकऱ्याची व त्याच्या तळतळाटाची कहाणी लिहून बसलास, ती फारच थोर आहे. संपूर्ण शेतीशी, मातीशी व त्या जीवनातल्या सुखदु:खाशी एकरूप झाल्याशिवाय असा अनुभव कवितेत उतरतच नाही. तू हे सगळं ताकदीनं मांडण्याचा प्रयत्न करतोस म्हणून व चांगली कविता लिहितो म्हणून तुला लाख धन्यवाद. खूप वाचत राहावं, लिहित रहावं. तेच सगळं शिकवतात.

X X X

( ना. धो. महानोर )

**॥ शरणागताचे स्तोत्र ॥**

शशिकांत शिंदे

मानसी प्रकाशन, कोल्हार खुर्द, ता. राहुरी, जि. अहमदनगर

... १६ ...

आजीचे लग्न तिच्या पंधराव्या वर्षी तिच्याहून पस्तीस वर्षांनी वयाने मोठ्या असलेल्या बिजवराशी होते. तेव्हापासून तिला नातवंडे, पतवंडे होईपर्यंतच नव्हे तर ती अखेरचा श्वास घेईतोपर्यंतचा आजीचा अवघा जीवनपट या कादंबरीत उलगडून दाखविला आहे.

ती प्रेमळ, नि:स्वार्थी, नि:पक्षपाती होती. हे तर खरेच ...

... तरीसुध्दा मनात प्रश्न येतोच, आजी कशी होती...? लग्नापूर्वी ओढवलेल्या 'त्या' प्रसंगामुळे आजीने आपले वैवाहिक आयुष्य ज्या तऱ्हेने भोगले ते योग्य होते काय ?

आणि सरतेशेवटी आजीने स्वत:हून कबुलीजबाब दिलेले 'ते' अमानुष कृत्य सद्‌भावनेपोटी केलेले का होईना, कितपत क्षम्य आहे ?

याचा शोधबोध प्रत्येक वाचकाला घ्यावासा वाटेल -

**एक होती आजी**

श्री. ना. पेंडसे

मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

... १७ ...

आजच्या अर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत अस्वस्थ होऊन धुमसणे हाच ग्रामीण जीवनाचा स्थायीभाव आहे. त्या अस्वस्थपणाचा स्फोट मराठी साहित्यात सुरू झालाच आहे. हे व्हायला हवेच होते. शिवाय साऱ्या जगातलं साहित्य समृध्द केलं आहे ते या 'झोंबी' सारख्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथांनीच ! - *पु. ल. देशपांडे*

**झोंबी**

आनंद यादव

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

... १८ ...

''माझी स्मरणशक्ती दांडगी आहे. कमावलेली आहे. फाफटपसारा विसरून महत्त्वाचे तेवढे लक्षात ठेवण्याची किमया तिला साधलेली आहे. अनेक वर्षांच्या पाठांतराच्या सवयीने ती पिळदार झालेली आहे, याचा अनुभव लिहिताना आला. जे, जसे घडले, तसे स्वच्छ आठवत गेले. मी लिहित गेलो. आणि या आजच्या दिवसापर्यंत ते पूर्ण करीत आणलेले आहे. हे लिहिताना सबंध आयुष्यच जणू काही मी पुन: जगलेलो आहे. ते जगलो, त्या त्या वेळचे रागलोभ जसेच्या तसे उमटलेले आहेत. आज त्यातला लोभ कायम असला तरी राग विझलेला आहे. आय हॅव मेड पीस विथ द वर्ल्ड !''

**तिसरी घंटा**, मधुकर तोरडमल, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

... १९ ...

मराठीतील ऐतिहासिक कादंबरीकारांनी भूतकाळाचा वेध घेण्याचा समर्थ प्रयत्न आजवर केला आहे. ...भारतीय इतिहासाला वळण मिळत असताना शोकात्म रंग प्राप्त झालेली व्यक्तिमत्त्वे नेमकी कोणती ते हेरून त्यांच्या अंतरंगाचा छेद घेण्यात त्यांची लेखणी गुंतते.

शेवटचा बाजीराव हे असेच एक व्यक्तिमत्त्व. मराठी राज्याचा पेशवा. ध्येयाच्या ध्रुव ताऱ्याचा वेध घेऊन शिवाजी राज्यांनी मराठी राज्याची ही डौलदार नौका नियतीच्या अथांग सागरात प्रथम लोटली. बाळाजी विश्वनाथापासून एकापेक्षा एक कुशल हातांनी या नौकेचे सुकाणू सांभाळले होते. .... पण.... पौर्णिमेनंतर अमावास्या येणे हा सृष्टीचा क्रम आहे. नौकेच्या मार्गात विशाल खडक मध्येच डोकावू लागले. ... अक्राळविक्राळ लाटा उठू लागल्या. याचवेळी सागराच्या शांत लाटांतही चलबिचल सूरू झाली, मार्ग अस्पष्ट झाला. नौका खडकावर आपटून फुटेल की काय अशी शंका जाणत्यांना अस्वस्थ करू लागली.

या वेळी सुकाणू होते दुसऱ्या बाजीरावच्या हातात. या हातामध्ये सामर्थ्य होते पाच पिढ्यांचे. पण याच वेळी नियतीने या मंत्रातले सामर्थ्य काढून घेतले. तेज मंद झाले व आपल्या मंत्रावेगळ्या झालेल्या दुबळ्या हाताने बाजीराव नौकेचे सुकाणू सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागला. त्या प्रयत्नांची कहाणी म्हणजे 'मंत्रावेगळा' ही ऐतिहासिक कादंबरी. फुटून सागरतळी गेलेल्या या नौकेचे काही अवशेष तरंगत तरंगत किनाऱ्यास लागले. दीडशे वर्षानंतर लेखक हे अवशेष हातात घेऊन सागरकिनारी उभा आहे. प्रतिभेचे पंख लावून तो एक एक घटना अनुभवतो आहे.

'मंत्रावेगळा' ही मराठीतील सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी आहे. असा निर्वाळा टीकाकारांनी दिला आहे.

**मंत्रावेगळा**

ना. स. इनामदार

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे

... २० ...

''सावरकरांचे भांडण कोणत्या धर्माशी नव्हते, कोणत्या राष्ट्राशी नव्हते. इंग्रजांनी भारत गुलाम केला, ह्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी त्यांचे वैर होते. पण जागतिक ज्ञानाची ही केंद्रभूमी, लोकशाहीची ही प्रयोगभूमी त्यांना वंदनीयच होती. ज्या तरूणांना सावरकर पचू शकले असते ते तरूण सावरकर बंधमुक्त होण्यापूर्वीच गांधीजींच्या नेतृत्वाखाली येऊन गेले. आणि सावरकर ज्यांना पचणेच शक्य नव्हते त्या भिरू, अंधश्रध्द, सनातनी, वयस्क मंडळींच्या कोंडाळ्यात सावरकरांना राहणे भाग पडले. ही भारतीय राजकारणाची शोकांतिका आहे.'' - *नरहर कुरूंदकर*

**सावरकरांचा बुद्धिवाद :**
**एक चिकित्सक अभ्यास**

प्रा. शेषराव मोरे

निर्मळ प्रकाशन, नांदेड

... २१ ...

प्रत्येक व्यक्तीच्या ठायी वेगवेगळे गुण कमी-अधिक प्रमाणात असतात. तसेच जन्मापासून प्रत्येकाला वेगवेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते व जेथे सहज यश मिळणार असते तेथे त्यांना अपयश प्राप्त होते. कारण काहीजण आपल्या विकसित कौशल्यांचा योग्य प्रकारे वापर करतात, तर काहीजण तसे करू शकत नाहीत.

या पुस्तकात यश मिळण्यासाठीचे काही मार्ग सुचविले आहेत. तरूणवर्ग, व्यावसायिक, शिक्षक व पालक या सर्वांना यांचा उपयोग नक्कीच होईल. प्रत्येकजण आजही यशाची व्याख्या बनवितो व त्यानुसार आपला मार्ग ठरवितो. अशा मार्गस्थांना हा ग्रंथ मार्गदर्शन करणारा ठरेल यात शंका नाही.

**मी जिंकणारच !**

कर्नल पी. पी. मराठे

डायमंड पब्लिकेशन, पुणे

... २२ ...

अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीला मराठी साहित्यात 'मानाचे पान' लाभलेले आहे. मराठी कादंबरीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अण्णाभाऊंची 'फकिरा' ही कादंबरी. अण्णाभाऊ जे लिहितात ते त्यांनी भोगलेले असते. ज्यांच्याविषयी ते लिहितात ती सारी त्यांची माणसे असतात. ... ही माणसं अन्यायाविरूध्द लढतात, सतत झुंजतात आणि प्रसंगी प्राणार्पणही करतात. त्यांची मानवी मूल्यांवरील श्रध्दा ढळत नाही. इंग्रजी सत्तेला आव्हान देणारा फकिरा आणि त्याची शौर्यगाथा सांगताना अण्णाभाऊंसारखा लोकशाहीर या अपेक्षित माणसाची तेजस्वी प्रतिभा सादर करतात.

'कलादृष्ट्या श्रेष्ठ' ठरलेल्या या कादंबरीला महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन तर गौरविलेच पण फकिराचे भारतीय भाषांबरोबर रशियन, झेक, पोलिश, जर्मन, या भाषांतही अनुवाद झाले आहेत. 'फकिरा'सारख्या झुंजार माणसाची कथा

LIBRARY AKOLE 422601

डॉ. आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अण्णाभाऊंनी अर्पण केली यात केवढे औचित्य आहे ! - *भालचंद्र फडके*

**फकिरा**

अण्णाभाऊ साठे

सुरेश एजन्सी, पुणे

... २३ ...

एकटी असले की आताशा कोण कधी समोर येऊन ठाकेल सांगता येत नाही. .... चोहूकडून नातवंडं येऊन बिलगतात आणि 'गोष्ट सांग' म्हणून चिवचिवाट करतात. .... हे सगळं किती लोभसवाणं आहे ! मग माझ्याच पापण्यात पुन्हा पुन्हा हे असं धुकं का जमा होतयं ? 'आहे मनोहर तरी गमते उदास' अशी ही मनाची अवस्था झाली असताना या पाखरांना मी गोष्ट तरी कोणती सांगू ? एक होता राजा आणि एक होती (एक कोण होती ?) ........ आणि एक होती परी की एक होती म्हातारी ? की ..... (दुसरं कुणी नव्हतंच ?) फक्त ......... एक होती परी आणि ती झाली म्हातारी ? ........ सफळ संपूर्ण व्हायला ही साठा उत्तरांची कहाणी नाहीच. ही साठा प्रश्नांची कहाणी सफळही नव्हे आणि निष्फळही नव्हे. अपूर्ण मात्र नक्कीच.

**आहे मनोहर तरी .....**

सुनिता देशपांडे

मौज प्रकाशन गृह, मुंबई

... २४ ...

नर्मदा प्रकल्प बनला होता आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक विलक्षण चक्रव्यूह. त्याच्या शोधयात्रेवर आधारित पुस्तक - माते नर्मदे. दुर्गा भागवतांनी हे पुस्तक अभ्यासून आपली भूमिका बदलून प्रकल्पाच्या बाजूने ठाम भूमिका घेतली. या पुस्तकामुळे उठलेली कडवट वादळे .... परीक्षणे .... पत्रे .... कुजबुजणारे सज्जे. आणि आता सुप्रीम कोर्टाने नर्मदा बचाव आंदोलनाची जनहित याचिका फेटाळून लावताना जे सांगितले ते -

'It was not public interest litigation
It was publicity interest litigation.' हे सर्व एकत्रित !

**समग्र माते नर्मदा**

दत्तप्रसाद दाभोळकर

छाया प्रकाशन, सातारा

... 25 ...

"I have grave doubts that leadership can be taught, but it can be developed. If you don't get started right with basic honesty, you won't be much of a leader. If you have what it takes, Dr. Cohen's book is very very well done and can help."

**The New Art of the Leader**

William A. Cohen, Ph. D.

Major General, USAFR, Ret.

Viva Books, New Delhi

... २६ ...

"आम्ही सारे हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तींच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे, असे मला वाटते. 'धर्म' शब्दाची थोडक्यात व्याख्या देवाजवळ पोहोचण्याचा मार्ग अशी करता येईल. लंडन, मुंबई, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरांत सर्व बाजूंनी रस्ते येऊन मिळतात. म्हणजे सर्व ठिकाणच्या लोकांचा उद्देश तो त्या त्या शहरी थोड्या वेळात व कमी श्रमाने पाहोचण्याचा असतो. त्याचप्रमाणे निरनिराळ्या देशांत व परिस्थितीत उत्पन्न झालेल्या धर्मांचाही उद्देश तोच आहे. यामुळे भिन्न भिन्न रस्त्यांनी मुख्य शहरांत पोहोचणाऱ्या लोकांना एकमेकांचे द्वेष करण्याचे जसे कारण नसते, तसेच निरनिराळे धर्म पाळून ईश्वराजवळ पोहोचणाऱ्या लोकांनी तरी परस्परांचा द्वेष का करावा ? 'दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान ?' यावरून पाहता देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे , 'जनीं जनार्दन' शोधणे व पाहणे हाच खरा धर्म आहे. याबाबतीत सर्व धर्मांचे ऐक्य आहे. परोपकार हा पुण्यमार्ग आहे व परपीडा हे पाप, असेच सर्व धर्म प्रतिपादन करतात. याप्रमाणे विचार केल्यास धर्मभेदाच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चुकीचे आहे." - *शाहू छत्रपतींच्या भाषणातून*

**लोकराजा शाहू छत्रपती**

डॉ. रमेश जाधव

सुरेश एजन्सी, पुणे

... २७ ...

सर्वच राजकीय पक्षांचं नेतृत्व बोलतं एक आणि करतं दुसरंच. अशी परिस्थिती आज असताना राजकीय नेत्यांच्या मतलबी कृतीवर केवळ प्रहार करत बसण्यास अर्थ नाही. समाजमनाच्या बदलावर उद्याच्या राजकारणाचा कस ठरणार आहे, अशी माझी समजूत आहे. व्यक्तिनिंदेपेक्षा प्रवृत्तीवर बोट ठेवून त्यात सुधारणा होण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्याची जबाबदारी संपादकावर आहे, अशी माझी धारणा आहे. त्यामुळे माझ्या लेखात व्यक्तिनिंदेपेक्षा प्रवृत्तीचर्चा अधिक असते, मला हे मान्य आहे. आजच्या राजकारणाबद्दल नेत्यांवर टीका करून समस्या

सुटणार नाहीत. समाजघटकांनी मनावर घेतलं तरच राजकारणाचा कस वाढू शकेल या आशावादातून केलेलं हे लेखन आहे. - एक संवाद : अरूण टिकेकरांशी

**अस्वस्थ महाराष्ट्र (खंड १ व २)**

(निवडक अग्रलेख)

अरूण टिकेकर

श्री विद्या प्रकाशन, पुणे

... २८ ...

सूर्य का चकाकतो ? तारे का लुकलुकतात ? ग्रह आडवेतिडवे का फिरतात? ग्रहणे का लागतात ? अनादी काळापासून आकाश माणसाला कोडी घालत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान सोडवायला मदत करत आहे ? विज्ञान, मुलभूत सैध्दांतिक चौकट पुरवून. आणि तंत्रज्ञान एकाहून एक अद्यावत साधने, दुर्बिणी, उपकरणे पुरवून.

शिवाय जुने प्रश्न सोडवताना अवचित नव्याने समोर येणाऱ्या अद्भुत थरारक गोष्टी आहेतच. उदा. कृष्णविवर, कृष्णपदार्थ, स्पंदक, क्वेसार.... आकाशाच्या गूढ गर्भामध्ये खूप काही दडले आहे.

'आकाशाशी जडले नाते' त्याचेच दर्शन घडवीत आहे. सखोल विज्ञानातल्या मनोवेधक किश्शांपासून आधुनिक माहितीपर्यंत .... जय सिंहाच्या जंतरमंतरापासून हबल दुर्बिणीपर्यंत ...

आर्यभटापासून आईन्स्टाईनपर्यंत .... सचित्र देखण्या पानापानातून अवकाशाची सफर करा.

आकाशाशी आपले नाते अधिकच घट्ट करा.

**आकाशाशी जडले नाते**

डॉ. जयंत नारळीकर

राजहंस प्रकाशन / पुणे

... २९ ...

जी. डी. बिर्ला, बा. हि. दोशी, कस्तुरभाई लालभाई,व जे. आर.डी. टाटा या आपल्या आयुष्यातच 'आख्यायिका' ठरलेल्या भारतातील चार महान उद्योगपतींच्या आयुष्याचा व अफाट कर्तृत्वाचा अत्यंत वेधक व विस्मयचकित करून टाकणारा पट येथे उलगडला आहे. या चार उद्योगमहर्षींची व्यक्तिचित्रं आहेत. ... अडचणींचे 'संधीत' रूपांतर करण्याचे त्यांचे सामर्थ्य किती प्रचंड होते, वैयक्तिक संपत्ती जमविण्याच्या पार पलीकडची त्यांची देशभक्तिमय उद्योजकता व आर्थिक राष्ट्रवादाची दुर्मिळ दूरदृष्टी किती प्रखर होती. याचे लेखिकेने चैतन्यमय गहिरे चित्र येथे रेखाटले आहे. त्यांच्या काळाच्या - देशाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, ताणाबाणाच्या विस्तृत अवकाशावर हे चित्र उभं केलं आहे, हा या लेखनाचा विशेष आहे.

लेखिकेने आजवर अस्पर्श राहिलेल्या अनेक स्त्रोतातून तपशील मिळवून संशोधनपूर्वक केलेलं हे लेखन नव्या उद्योजकांना प्रेरक ठरेल.

**बिझिनेस लेजंड्स**

गीता पिरामल

अनुवाद : अशोक जैन

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

... ३० ...

'अन्धेर नगरी चौपट राजा' एक लोककथा पर आधारित है, जिसमें भारतेन्दु ने राज्यव्यवस्था, जाति-प्रथा, उच्च वर्गोंकी काहिली और खुशामदपसन्दी की तीखी और समर्थ आलोचना कि है । डॉ. रामविलास शर्मा के शब्दों में ''अन्धेर नगरी राज्य की अन्धेरगर्दी की आलोचना ही नहीं, वह इस अन्धेर गर्दी को खत्म करने के लिए भारतीय जनता की प्रबल इच्छा भी प्रकट करता है । इस तरह भारतेन्दुने नाटकों को जनता का मनोरंजन करने के साथ उसका राजनीतिक शिक्षण करने का साधन भी बनाया । इसके प्रति और हास्य भरे वाक्य लोगों की जबान पर चढ गए हैं और भारतेन्दु की प्रहसनकला यहाँ अपने चरमोत्कर्ष पर दिखाई देती है ।''

**अन्धेर नगरी**

भारतेन्दू हरिश्चंद्र

रामकमल प्रकाशन प्रा. लि., नई दिल्ली

... ३१ ...

प्रख्यात हिन्दी कवि हरिवंशराय 'बच्चन'की आत्मकथा का पहला खंड, 'क्या भूलूँ क्या याद करूँ', जब १९६९ में प्रकाशित हुआ तब हिंदी साहित्य में मानो हलचल-सी मच गई । यह हलचल १९३५ में प्रकाशित 'मधुशाला' से किसी भी प्रकार कम नहीं थी । समकालीन अनेक लेखकों ने इसे हिंदी इतिहास की ऐसी पहली घटना बताया है जब अपने बारे में इतनी बेबाकी से सब कुछ कह देने का साहस किसी ने दिखाया । साथ ही अपने कवि के विकास और समूचे काल तथा क्षेत्र को भी उन्होने अत्यंत जीवन्त रूप में उभरकर प्रस्तुत किया । ..... इस आत्मकथा के माध्यम से कवि ने गद्य लेखनों मे भी नये मानदंड स्थापित किये ।

बच्चन की यह कृति आत्मकथा साहित्य की चरम परिणति है और इसकी गणना कालजयी रचनाओं में की जाती है ।

**१. नीड का निर्माण फिर**
**२. क्या भूलूँ क्या याद करूँ**
( आत्मकथा )
डॉ. हरिवंशराय बच्चन, राजपाल एन्ड सन्स, दिल्ली

... ३२ ...

भारत के इतिहास में केवल कैप्टन डॉ. लक्ष्मी सहगल को ही स्वतंत्र भारत की सर्वप्रथम महिला मंत्री तथा महिला रेजीमेंट का संस्थापक और कमांडर बनने का गौरव प्राप्त है ।
प्रस्तुत पुस्तक कैप्टन डॉ. लक्ष्मी सहगल द्वारा लिखित स्वयं की जीवन गाथा तथा आजादी की लढाई में आजाद हिंद फौज की महत्त्वपूर्ण भूमिका का जीवन्त दस्तावेज है जिसमें उन्होने बताया है की, राष्ट्रीय स्वतंत्रता संग्राम से समाजवाद की ओर जानेका रास्ता उन्होने कैसे तय किया । जुल्म और शोषण के खिलाफ लढने की तडफ, शोषण विहीन समाज की स्थापना के लिए अनवरत संघर्ष करने की प्रतिबध्दता तथा संपूर्ण मानवता के लिए उच्चस्तरीय मानवीय संवेदना भरी उनकी संघर्षमय तथा बलिदानपूर्ण जीवनगाथा न केवल सबको स्तब्ध कर देगी, बल्कि हमारे राष्ट्र के प्रत्येक नागरिक, विशेषकर युवा पीढी के लिए प्रेरणादायक सिध्द होगी ।

**मेरा जीवन संघर्ष**
कॅप्टन (डां.) लक्ष्मी सहगल
प्रभास प्रकाशन, इलाहाबाद

... ३३ ...

हम नम्र बने,
हम सोचे, यह जरूरी नहीं
कि सच पूरी तरह
हमारे ही साथ हो ।
हम दूसरों से सहयोग करें,
और भले ही हम उनके विचारोंसे सहमत न हो,
हम उनके जीवन और आदर्शों की कद्र करें ।

X X X
(जवाहर लाल नेहरू)

**युगपुरूष नेहरू**
रस्किन बॉण्ड, ओरिएंट पेपर बॉक्स, दिल्ली

... ३४ ...

''व्हेन आय वॉज बेअर्ली एट, माय फादर, व्हू वॉज असलो माय गुरू, हॅड टोल्ड मी, 'फीअर ओन्ली यूवर ओन सेल्फ. आस्क यूवरसेल्फ व्हेदर व्हॉट यू आर डुईंग इज् राईट अ‍ॅण्ड इफ दी अन्सर इज एस्, देन मुव्ह अहेड विदाऊट अ सेकंड थॉट. आय हॅव्ह फॉलोड हिज मंत्र टू दिस डे.''

X X X
( लता मंगेशकर )

**इन सर्च ऑफ लता मंगेशकर**
हरिश भिमानी, इंडस, न्यू दिल्ली

... ३५ ...

प्रत्येकाला अखेर मरायचेच आहे . ही वस्तुस्थिती अगदी वादातीत आहे. प्रश्न इतकाच आहे की जो मृत्यू अनिवार्यपणे येणारच आहे तो वेदनाशून्य आणि झटपट का असू नये? आजचे उपलब्ध शास्त्रीय ज्ञान वापरून हे सुलभ रीतीने घडवून आणणे पूर्णत: शक्य आहे. फाशीची शिक्षा झालेल्या माणसासाठी अमेरिकेत वापरण्यात येणारी पध्दत, आधुनिक कत्तलखाण्यात प्राण्यांना मारण्यापूर्वी त्यांना बधीर करण्याची घेण्यात येत असलेली काळजी इत्यादी प्रकारांत आपण जो मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारलेला आहे तो आपण स्वत:च्या मृत्यूच्या बाबतीत, आपली इच्छा असल्यास का स्वीकारायचा नाही ? हा दृष्टिकोन स्वीकारण्याच्या मार्गात सध्याच्या स्व-हत्ये संबंधीच्या कायद्याचा जो अडसर आहे तो कशासाठी ?

**जगायचे की मरायचे**
(माणसाला हक्क हवा निवड करण्याचा)
विनायक राजाराम निमसे, उन्मेष प्रकाशन, पुणे

... ३६ ...

दैनंदिन जीवन जगताना लहानमोठ्या समस्यांना, ताणतणावांना सामोरे जावे लागते. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेत मार्ग काढावा लागतो. यासाठी अर्थातच मनोनियंत्रण महत्त्वाचे ठरते. विचार आणि भावना यावरील नियंत्रण सुटले की माणूस अनिर्बंध वागू, बोलू लागतो. स्वत:चे व त्याचबरोबर इतरांचे जगणे अवघड करून टाकतो आणि सुखापासून दूर जातो.

सुखाच्या आड येणाऱ्या आपल्या स्वभावातील त्रासदायक गोष्टी दूर करून स्वविकास साधत इतरांबरोबरचे संबंध सुरळीत ठेऊन सुखी होता येते. स्वत:च्या मर्यादा व 'स्व' ची ओळख ह्या गोष्टींचे भान ठेवले तर आपल्यालाच मनाची मदत घेऊन आपण आपल्या दृष्टिकोनात बदल घडवून आणू शकतो. अन् आपले प्रश्न सोडवू शकतो. हे कसे साधावयाचे ते सांगणाऱ्या लेखांचा हा संग्रह आहे.

**सुखाने जगण्यासाठी**
डॉ. विजया फडणीस
श्रीविद्या प्रकाशन, पुणे

□ □ □

# संशोधनकार्यात ग्रंथपालाची भूमिका

श्री. प्रविण घुले
सहाय्यक ग्रंथपाल

**प्रस्तावना :**

सुरवातीच्या काळात ग्रंथालयात काम करताना केवळ एखाद्या विषयावरची, एखाद्या लेखकाची वा काही लेखकांची पुस्तके काढून देण्याचे काम ग्रंथपालाला करावे लागत होते. पुढे वाचकांच्या प्रश्नाचे उत्तर बदलत गेले. आणि त्यात संदर्भ ग्रंथांच्या आधारे माहिती देण्याची पध्दत रूढ झाली. त्याला संदर्भसेवा म्हणून महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. वाचकांनी या बरोबरच अनेक प्रकारच्या सेवा ग्रंथालयांनी द्याव्यात अशी अपेक्षा करायला सुरवात केली. त्यात सूची, जागरूकता (CAS), भाषांतर, सारांश, निर्देश, निवडक माहिती सेवा (SDI) अशा अनेक प्रकारच्या अनेक सेवांचा सामावेश झाला. ग्रंथालयांनी या सेवा दिल्यामुळे आणि वाचकांच्या गरजांची प्राप्ती वाढल्यामुळे ग्रंथालयाकडे संशोधनासाठी साहित्याची मदत मिळण्याचे केंद्र या दृष्टिकोनातून पाहिले जाते. पुढे संदर्भसेवेचे स्वरूप केवळ अडलेले संदर्भ काढून घेणे यापुरतेच सीमित राहिले नाही. चर्चा, मार्गदर्शनाची अपेक्षा, ग्रंथालयाकडून वाचक करू लागले. संशोधनात सहाय्य मिळावे ही तर मूलभूत गरज निर्माण झाली. ग्रंथालयात येणारा वाचक हा या अपेक्षेने येतो. त्याच्या संशोधन कार्यात त्याला ग्रंथपालाच्या मदतीची आवश्यकता असते, सहकार्याची आवश्यकता भासते. ही व अशा प्रकारची मदत करण्याकरिता तो ग्रंथपालाकडे येतो. प्रथम संशोधनात्मक दृष्टी आणि वृत्ती असेल तरच त्याला अशी मदत करता येईल अन्यथा वाचकांची निराशा होऊ शकते.

**संशोधन म्हणजे काय :**

शब्दकोशात संशोधन याचा अर्थ चौकशी अथवा शोध असा दिलेला आहे. ''अभ्यासाचा किंवा काळजीपूर्वक तपासाचा अथवा सखोल चौकशीच्या साहाने वस्तुस्थिती व तथ्य शोधून काढण्याचा शास्त्रीय स्वरूपाचा पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय.''

ज्ञान शाखेतील कोणत्या बिंदुपाशी कोणाला थांबावेसे वाटेल, चौकशी अथवा शोध घ्यावासा वाटेल, हे सांगता येणार नाही. ही चौकशी एखाद्याने सुरू केली की संशोधनाला सुरूवात होते व त्यात काही तथ्य आढळले तर संशोधनाला पूर्णत्व येते. हे तथ्य नुसते सापडून चालत नाही. तर त्याचे सादरीकरणही व्यवस्थित करावे लागते. संशोधनाच्या या प्रत्येक टप्प्यावर ग्रंथालयाची आणि ग्रंथपालाची जरूरी भासते.

**संशोधन (व्याख्या) :-**

१. संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञानाचा शोध होय. - *एम्. एच्. गोपाल, इन्ट्रोडक्शन टु रीसर्च प्रोसिजर इन सोशल सायन्स*

२. संशोधन म्हणजे ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये शोधण्यासाठी, तपासण्यासाठी काळजीपूर्वक, पध्दतशीर व नेटाने केलेला अभ्यास होय. - *कुंभोजकर*

३. संशोधन म्हणजे नवे ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पध्दतशीर प्रयत्न होय. - *भांडारकर पु. ल.*

४. संशोधन म्हणजे तथ्ये शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा वा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीर केलेले परीक्षण होय. - *बेबस्टर शब्दकोश*

**संशोधन कार्यात ग्रंथपालाची भमिका :**

**१) वाचन साहित्याच्या विश्लेषणात सहकार्य :**

सूची (मग ती वर्णनात्मक असो वा सारात्मक असो) दिली की काम झाले असे संशोधक मानत नाहीत. संशोधकाला वाचन साहित्याच्या निवड प्रक्रियेमध्ये सहाय्य हवे असते. एखादा ग्रंथ, लेख अथवा अहवाल योग्य आहे का ? अमुक एक वाचन-साहित्याचा वापर संशोधनात करावा का ? त्यातील निष्कर्ष ग्राह्य मानावेत की मानू नयेत ? संशोधनाला जगात मान्यता मिळाली आहे की ते संशोधन अमान्य करण्यात आले ? विरोध झाला असेल तर त्याची कारणे काय आहेत ? त्या विषयांत त्यांचा अधिकार किती मोठा मानला जातो ? अशा स्वरूपाचे प्रश्न एखाद्या लेखाबाबत, ग्रंथाबाबत वा संशोधन अहवालाबाबत संशोधकांच्या मनात निर्माण होतात. सूचीमधील नोंदी बरोबर असणारी वर्णने अथवा सार अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीत. अशा वेळी संशोधकाला योग्य अशा मार्गदर्शनाची गरज असते. ही गरज ग्रंथपाल पूर्ण करू शकतो.

प्रामुख्याने संशोधन क्षेत्रात नव्याने आलेल्यांना मात्र

नेहमीच असे प्रश्न पडतात. त्यांना तर अशा प्रकारच्या सहाय्याची गरज पडते. अर्थात नामवंत आणि संशोधन कार्यात प्रदीर्घ कालावधी घालविलेल्या संशोधकांनाही अशा प्रकारच्या सहाय्याची गरज असते. कारण विविध प्रकारचे अनेक ठिकाणी प्रसिध्द होणारे साहित्य अशा संशोधकांच्या वाचनात येत असते आणि त्यांना तेवढा वेळही त्यासाठी देता येणे शक्य नसते.

**२) त्या विषयात येणाऱ्या नवनवीन माहितीवर देखरेख -**

या स्वरूपाचे कार्य ग्रंथपालाला नवीन नाही. प्रचलित जागरूकता सेवेसारख्या माध्यमातून ग्रंथपाल आजपर्यंत अशा स्वरूपाची सेवा देत आलेलेच आहेत. पण हे कार्यही इतके जुजबी स्वरूपाचे अपेक्षित नाही. उअड ही सेवा पूर्ण शक्तिनिशी, शोधक नजरेने राबवावी अशी अपेक्षा आहे. पूर्वी या प्रकारच्या सेवा जाता-जाता, वाचता-वाचता काही संदर्भ सापडले तर तर ते देण्याकडे कल असतो.

आता मात्र हेतुत: भान ठेवून सतर्कपणे, जागरूक राहून या प्रकारची मदत ग्रंथपालाने करावी, अशी संशोधकाची अपेक्षा असते. तुम्ही ज्या विषयावर संशोधन करीत आहात त्या विषयावर अमुक नियतकालिकात अमुक एखादा लेख आलेला आहे, हे संशोधकाला कळविले की काम भागत असे. पण आता ही नुसती अपेक्षा संशोधक करीत नाही; तर सादर केलेल्या लेखाचा पाठपुरावा करणे अपेक्षित असते. एखादा लेख ग्रंथपालाने संशोधकाला पाठविला असेल तर त्याच्याशी निगडित साहित्यावर लक्ष ठेवावे लागते. त्यावर प्रतिवाद अथवा माहितीची भर घालणारे साहित्य प्रसिध्द होत नाही ना, पत्रव्यवहाराच्या पातळीवर कोणी त्याबाबत प्रतिक्रिया तर सादर केलेली नाही ना, एखाद्या परिसंवादात, चर्चासत्रात त्यावर काही भाष्य केले नाही ना, भाषणात कोणी त्याचा उल्लेख तर केला नाही ना, मुलाखती मध्ये कोणी त्यावर मत व्यक्त केले तर नाही ना, इत्यादी अनेक घटकांकडे जातीने लक्ष ठेवावे लागते. हे कार्य ग्रंथपालाने करावे अशी अपेक्षा आहे.

**३) चर्चा, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन :-**

संशोधन कार्यात संशोधक विद्यार्थ्यास प्राध्यापक अथवा तज्ज्ञ संशोधक मार्गदर्शन करीत असतात. ही मंडळी त्या संशोधकांच्या संशोधनाच्या संदर्भात आलेल्या शंका, अडचणी याबाबत सल्ला व मार्गदर्शन करीत असतातच; पण मग संशोधकाची ग्रंथपालाकडून काय अपेक्षा असते ?

अनेकदा संशोधकाची संभ्रमित अवस्था निर्माण होते. केलेले संशोधन चुकीच्या मार्गावर येऊन ठेपलेले असते. काही वेळा निष्कर्षच हाती येत नाही, मार्गदर्शकाने निर्णय संशोधकावर सोपविलेला असतो, अशा अनेक प्रसंगांत ग्रंथपाल त्याचा चांगला मित्र होऊ शकतो. निराशेच्या काळात प्रोत्साहन देणे, उमेद धरता येईल असे वातावरण तयार करणे. असे खेळीमेळीचे, हलकेफुलके वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता असते. ग्रंथपाल हे करू शकतो.

**४) लेखन कार्यात सहकार्य :**

संशोधकाने प्रयोगशाळेतील अथवा वाचनाचे काम संपविले किंवा मुलाखतीचे, इत्यादी काम संपविले म्हणजे त्याचे काम पूर्ण होत नाही. हाती आलेल्या माहितीचे विश्लेषण, आलेख, सांख्यिकी तपशील, निष्कर्ष संशोधकाला काढावे लागतात. त्यासाठी आकृत्या, टेबल्स, वेगवेगळ्या प्रकारचे तक्ते तयार करावे लागतात. अशा कामात ग्रंथपालाने सहकार्य करावे अशी अपेक्षा असते. वेगवेगळ्या प्रकारच्या संशोधकांनी वापरलेल्या पद्धती वेळोवेळी त्याच्या नजरेस आणून द्याव्या लागतात. त्याचा संशोधनाचा विषय लक्षात घेऊन त्या संशोधनाला अचूक व उपयोगी ठरू शकणाऱ्या त्या पध्दतीची शिफारस करावी लागते. अमुक एक पध्दत संशोधनात पूर्वी किती संशोधकांनी वापरली आहे, त्यामुळे त्यांचा काय फायदा झाला आहे, शास्त्रीय असणाऱ्या पध्दती कोणत्या, अशा प्रकारचे मार्गदर्शन व सहाय्य ग्रंथपालाकडून अपेक्षित असते.

प्रत्यक्ष प्रलेखाला सुरूवात होते त्यावेळी अचूक शास्त्रीय परिभाषा, वाक्यरचना येथून अडचणी येतात. संशोधन प्रकल्पाचा, प्रबंधाचा अहवालाचा ठराविक एक ढाचा किंवा आराखडा असतो. त्यानुसार लेखन करावे लागते. संदर्भ व तळटिपा देण्याच्या पध्दती, सूची सादर करण्याच्या पध्दती याची संशोधकाला फारशी माहिती नसते. या कार्यात तर ग्रंथपालाची मदत फार कामी येते.

प्रबंध अथवा अहवाल शेवटी विद्यापीठात वा संशोधन संस्थेला सादर करावा लागतो. लेखनामध्ये सादरीकरणाला विशेष महत्त्व आहे. फोटो, मुळ प्रतींचा दाखला, आलेख, नकाशा, चित्रे, रेखाटने इत्यादींचा वापर करावा लागतो. हे सर्व साहित्य नेमके कुठे बसवावे, कागद, त्याचा आकार, बांधणी, टाईप्स इत्यादी माध्यमातून प्रबंध करावा लागतो. या सर्व गोष्टींचा परिचय संशोधकांना असतोच असे नाही. अशा वेळी ग्रंथपालाने त्यास मदत करणे अपेक्षित आहे.

**५) प्रसिध्दी कार्यात सहकार्य :**

संशोधन पूर्ण झाल्यानंतर ते प्रसिध्द व्हावे असे

संशोधकाला वाटत असते, पुस्तकरूपाने, नियतकालिकात , लेख स्वरूपात, किंवा व्याख्यानाद्वारे, चर्चा, परिसंवादाच्या रूपाने, ध्वनी/ चित्रफितीच्या द्वारे ते लोकांसमोर जावे, असे वाटत असते. अशा वेळी अचूक प्रकाशकाची, नियतकालिकाची निवड करून त्याचे पत्ते, संशोधकाला ग्रंथपालाने पुरविले तरच संशोधकाचा वेळ वाचू शकतो. संस्थांकडे नावे सुचवून भाषण, परिसंवाद, चर्चासत्रासाठी विषय सुचविता येऊ शकतात. संशोधकाला याची माहिती नसते. ग्रंथपालाकडून तो या मदतीची अपेक्षा करीत असतो.

मुख्यत: संशोधक बऱ्याचदा प्रसिध्दी पराङ्.मुख असतात. त्यांच्या मागे लागावे लागते. जर संशोधन प्रसिध्द झाले नाही तर पुढील संशोधकाचा तोटा होऊ शकतो. प्रसिध्दी मिळाली तर संशोधकाला पुढील संशोधन कार्यात अधिक उत्साह येऊ शकतो. ग्रंथपालाने या गोष्टींकडे जातीने लक्ष दिल्यास संशोधकास समाधान वाटू लागते.

**६) पेटण्ट्स, कॉपीराईट्स, ट्रेडमार्क्स इत्यादी संबंधी मार्गदर्शन :**

संशोधक आपल्या संशोधनात इतके गर्क झालेले असतात की या संशोधनाच्या स्वामित्वासंबंधी ते पूर्णत: अनभिज्ञ असतात. संशोधनपूर्व एखाद्या विषयासाठी कोणती कायदेशीर काळजी घ्यायची असते, संशोधन पूर्णत्वास गेल्यानंतर कोणती खबरदारी घ्यायची असते याबद्दल संशोधकांना कल्पना / माहिती देणे, या प्रकारची मदत ग्रंथपालाकडून अपेक्षित असते.

हा विषय गॅट करारामुळे आणि जागतिकीकरणामुळे फारच महत्त्वाचा आणि नाजुक झाला आहे. अनेक देशातील संशोधकांनी वेगवेगळ्या वस्तूंवर पेटन्ट्स घेऊन ठेवले आहेत. बासमती तांदुळ, हळद इत्यादी बाबत झालेले वाद लक्षात घेता संशोधनातील हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रंथपाल या संदर्भात संशोधकांना अचूक मार्गदर्शन करू शकतो.

**७) नवीन विषय सुचविण्यात मार्गदर्शन :**

प्रत्येक वेळी संशोधकांना नवीन विषय सुचतीलच असे नाही. चर्चेतून, गप्पांतून, एखाद्या विषयाची महती विशद करताना नवीन विषय सुचून जातात. ग्रंथपालाची खोली अशा चर्चेचे व्यासपीठ बनले तर या नवनवीन कल्पनांचा साक्षात्कार होऊ शकतो. ग्रंथपाल नवीन कल्पनांवर विचार करून सहाय्य करू शकतो.

अशा प्रकारे संशोधन कार्यात ग्रंथपालाची भूमिका विशद करता येईल किंवा संशोधन कार्यात संशोधकाला ग्रंथपाल याप्रकारे मदत व साह्य करू शकतो. ग्रंथपालाला संशोधकांना मदत करण्यासाठी स्वत:ला विचार करावा लागतो. त्यासाठी वाचनाची आवड जोपासावी लागते. जिज्ञासा निर्माण करणे, शोधक नजर ठेवणे, संग्रहावर हुकमत मिळविणे, संदर्भ ग्रंथाची माहिती करून घेणे, सूचिशास्त्रातील ज्ञान मिळविणे, चर्चा, परिसंवाद, व्याख्यानाची आवड लावून घेणे, तज्ज्ञ मंडळींचा सहवास वाढवणे याशिवाय लेखनाची आवड लावून घेतल्यास हा विकास शक्य आहे.

**उच्चशिक्षण संशोधनातील साहित्य शोध :-**

साहित्याची विशेषत: शास्त्रीय, तांत्रिक आणि सामाजिक साहित्याची अमर्यादित वाढ होत आहे. हे साहित्य , ग्रंथ, नियतकालिके, पत्रके, तालिका, विवरणे, प्रतिवृत्ते (Reports) वगैरे विविध स्वरूपात प्रसिध्द होत असते. या पैकी पुष्कळशा प्रकाशनात त्याच माहितीचा पुनरूल्लेख किंवा पुनरावृत्ती झालेली असते व ती गोष्ट ते प्रकाशन वाचल्याशिवाय किंवा अवलोकन केल्याशिवाय कळणे शक्य नसते.

संशोधकांना माहितीच्या विशाल विश्वात दडलेली विवक्षित माहिती मिळविण्याचे कार्य हे सहज शक्य नसते. प्रकाशित साहित्यातून, 'यद् रोचते तत् ग्राह्यम, यद् न रोचते तत् त्याज्यम्' (जे योग्य आहे ते ग्रहण करावे व अयोग्य आहे त्याचा त्याग करणे.) हे सुध्दा वाटते तेवढे सोपे नाही. त्यासाठी साहित्य निदान नजरेखालून तरी गेलेले असावे लागते.

विज्ञानाचे स्वरूप आंतरशाखीय असल्यामुळे निरनिराळ्या विषयांवरील विविध प्रकारचे साहित्य पाहून त्यातून हवी असलेली माहिती शोधावी लागते. ही माहिती केवळ ग्रंथामध्ये उपलब्ध नसून ती नियतकालिके, संशोधन प्रतिवृत्ते, पेटंट्स, शोधनिबंध, प्रबंध यासारख्या प्राथमिक साधनात तसेच विवेचनात्मक निबंध, संदर्भग्रंथ यासारख्या द्वितीयक साधनात व निर्देशिका, सूची वगैरे अनेक प्रकारच्या साहित्यात दडलेले असते. या शोधाला साहित्यशोध (Literature search) असेही म्हणतात.

हे सर्व साहित्य संशोधकाला अवगत असलेल्या भाषेत उपलब्ध असतेच असे नाही. पुष्कळदा हवी असलेली माहिती अन्य भाषेतील नियतकालिकात किंवा प्रतिवृत्तात प्रसिध्द झालेली असते.

हवी असलेली माहिती, समाविष्ट असलेला लेख कधी कधी नजीकच्या ग्रंथालयात उपलब्ध असतो.

एकंदरीत पाहता ज्ञानाच्या अपार सागरातून विशिष्ट संशोधन कार्यासाठी किंवा प्रयोगासाठी उपयुक्त असे साहित्य शोधणे हे देखील वाटते तितके सोपे काम नाही. शिवाय माहिती शोधनाचे काम करीत असतांना संशोधकाच्या प्रायोजिक कार्यात खंड पडणे देखील इष्ट नसते. संशोधन विशिष्ट काळात पूर्ण केले तरच त्याचे महत्त्व असते. तेव्हा संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती शोधून काढायची म्हणजे तेवढ्यापुरते संशोधन कार्य बंद ठेवावे लागेल. शिवाय माहितीच्या आवाढव्य पसाऱ्यातून योग्य अशी माहिती शोधून काढण्यास कित्येक दिवस लागण्याचाही संभव असतो.

माहिती शोधताना आपल्याला हवी असलेली माहिती ग्रंथ किंवा प्रलेख नजरेतून सुटणार नाही ना ! हेही पाहावे लागते व हवी असलेली माहिती समाविष्ट असलेला प्रलेख देखील शोधावा लागतो. ही गोष्ट साध्य करण्यासाठी सारविषयक नियतकालिके (Abstracting Periodicals), निर्देश (Index), प्रचलित जागरूकता सेवा (C.A.S), निवडक माहितीचे प्रसारण (S.D.I), वगैरे तंत्रे उदयास आलेली आहेत.

**संशोधनातील साहित्य शोधाचे महत्त्व :-**

विज्ञान किंवा तंत्र विज्ञान व सामाजिक शाखांमध्ये ग्रंथालय शास्त्रात संशोधन किंवा विकास कार्य करावयाचे असल्यास त्या विशिष्ट क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानाव्यतिरिक्त त्या क्षेत्रात अगोदर होऊन गेलेल्या कामाचा व उपलब्ध साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा घेणे आवश्यक असते. संशोधन करण्यापूर्वी ग्रंथालयातील साहित्याचा शोध (Literature Search) घेणे अतिशय महत्त्वाचे असते व या कामासाठी ग्रंथालयाची जरूरी असते.

साहित्य शोध घेतल्याने सुरवातीपासूनच त्या विषयासंबंधीची संपूर्ण माहिती कळते. यामुळे अनावश्यक माहिती व माहितीची पुनरावृत्ती होत नाही व पुढील लोकोपयोगी संशोधन करता येते.

हे साध्य करण्यासाठी विशिष्ट विषयातील साहित्य मिळवून व त्याचे योग्य तऱ्हेने जतन करून ते वाचकांना व अभ्यासकांना उपलब्ध करून देणे आवश्यक असते. अशा रीतीने निरनिराळ्या विषयावरील साहित्य जमवून त्यांच्यासाठी वेगवेगळी ग्रंथालये काढल्याने माहितीचा प्रश्न सोडविण्यास मदत होते. अशा विशिष्ट विषयावरील ग्रंथालयांना **विशेष ग्रंथालय** असे नाव आहे. या प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये विशिष्ट विषयावरील साहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्या त्या विषयाच्या संशोधकांना व अभ्यासकांना त्याचा उपयोग करता येतो.

**संशोधनातील साहित्याचा आढावा घेण्याचे महत्व :-**

संबंधित विषयाचा आढावा घेतांना सर्वच साहित्याचे वाचन करावे असे नसून वाचन निवडक असणे महत्त्वाचे आहे. विषय निवडीपासून सुरूवांत करताना प्रथम विशिष्ट विषयातील निवडक अशा साहित्याचा आढावा घ्यायचा असतो. त्यामुळे या विषयावर कोणते व किती साहित्य उपलब्ध आहे याची कल्पना येते. आतापर्यंत कोणकोणत्या विषयावर संशोधन झाले आहे, सुरू आहे याची कल्पना येते. तसेच त्यामुळे सूक्ष्म अशा विषयावर पुरेसे साहित्य उपलब्ध आहे किंवा नाही याची कल्पना येते.

साहित्याचा शोध घेतल्यास त्या विषयाचे ज्ञान मिळते. तसेच संशोधन विषयातील संज्ञांचा अर्थ, व्याप्ती, मर्यादा याचीही माहिती मिळते. त्याचा उपयोग संशोधनाची गृहीते निश्चित करण्यास होतो.

संबंधित साहित्याचा आढावा घेतल्यामुळे योग्य संशोधन आराखडा, माहिती, पृथ:करणाचे महत्त्व कळते. त्याच विषयातील इतर संशोधकांनी कोणकोणत्या साहित्याचा उपयोग केला याचीही माहिती मिळते. त्यामुळे, निवड केलेल्या विषयांवरील ग्रंथसूची उपलब्ध झाल्यामुळे त्या साहित्याचा आढावा घेण्यास मदत होते. तसेच त्याच विषयातील इतर संशोधकांनी संशोधन अहवाल कसा तयार केला याची कल्पना येते, त्यांना आलेल्या अडचणींची माहिती मिळते व त्यातून बोध घेता येतो.

साहित्याचा आढावा घेतल्यास संशोधनातील पुनरावृत्ती (Duplication) टाळता येते. या ठिकाणी असा अनुभव आहे, की बहुतेक सर्वच विद्यापीठांमध्ये अर्ध्याहून अधिक संशोधन विषय नोंदणी करतांनाच नामंजूर केले जातात. कारण त्या विषयावर आधीच शोध-प्रबंध सादर झालेले असतात. काही विद्यापीठ संशोधकांकरिता काही मार्गदर्शक सूचना गॅझेटमध्ये परिचारित केल्या आहेत व त्याचा अवलंब करणे संशोधकांना बंधनकारक केले आहे. त्यामध्ये Synopsis मध्ये Review of Literature हे प्रकरण आवश्यक केलेले आहे.

सध्या संशोधन प्रबंध सादर करणे ही पीएच्. डी. पदवी मिळविण्यासाठी पूर्ण करावयाची एक औपचारिकता आहे, असेच चित्र सर्व भारतभर विद्वानांनी आजच्या संशोधनाबाबत व्यक्त केलेल्या मतांवरून दिसून येते.

किती संशोधक संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी संशोधन पध्दतीचा, तंत्राचा प्रथम अभ्यास करतात, किती संशोधक प्रबंध लिहिण्याच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मानकांचा (Style Manuals) चा अभ्यास करतात किंवा कितींना त्यांच्या अस्तित्वाची माहिती आहे, हा एक अभ्यासाचा विषय होऊ शकेल. पण संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांचा अवलंब करणे तितकेच महत्त्वाचे आहे, हे सत्य नाकारता येणार नाही.

**संशोधन साहित्यातील साहित्यशोधाची साधने -**

संशोधन सुरू करण्यापूर्वी संशोधकाला त्याच्या विषयावरचे सर्व काही उपलब्ध साहित्य पहायला हवे असते. त्या त्या विषयाच्या प्रगतीची सद्यस्थिती माहिती करून घ्यायची असते. ही अशा प्रकारच्या माहितीची गरज ग्रंथ सूची निर्देश आणि सार सेवांचा व्यापक शोध घेऊनच पुरी करता येते. या शोधण्याला **साहित्य शोध** असेही म्हणतात. ग्रंथसूची आणि निर्देश आणि सार सेवांची रचना अशी असते की हा व्यापक शोध सहजपणे करता यावा. छापील ग्रंथसूची आणि निर्देशात शोध घेण्याच्या कार्याला माणसांकरवी शोध असे म्हणतात. हा शोध संगणकातील ग्रंथसूची आणि निर्देशाचा उपयोग करूनही घेता येतो.

बऱ्याचशा ग्रंथालयात साहित्य शोध सेवा दिली जाते. असा शोध सुरू करण्यापूर्वी ग्रंथालय सेवकांने संशोधकाला नेमक्या कोणत्या प्रकारची माहिती असलेली प्रलेख पाहिजे आहेत हे समजावून घेणे आवश्यक असते. म्हणून शोध घेण्यापूर्वी संशोधकांकडून पुढील माहिती मिळविणे आवश्यक आहे.

१. किती जुन्या काळापर्यंतचे प्रलेख शोधावेत ?
२. विषयाचा नेमका मथळा काय आहे ?
३. शोध व्यापक असावा की काय ?
४. विशिष्ट देश, भुभाग यांच्याशी निगडित प्रलेख हवेत कां ?
५. शोधात कोणत्या प्रकारचे प्रलेख घ्यावेत किंवा वगळावेत ?

**१) ग्रंथसूची** (Bibliography) **:-**

ग्रंथसूची ही अस्तित्वात असलेल्या संपूर्ण ज्ञानभांडाराची गुरूकिल्ली आहे. मुद्रणकलेच्या शोधानंतर आणि विशेषत: जगभर प्रकाशन व्यवसाय वाढल्यापासून ग्रंथ, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्याच्या निर्मितीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. विद्याव्यासंगी लोकांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी या साहित्याची माहिती होणे आवश्यक असते. या साहित्याचा परिचय होण्यासाठी त्यांची यादी अथवा सूची यासारखे साधन संशोधकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. ग्रंथ सूची या संशोधकांना लेखकांना, पालकांना आणि विविध.व्यावसायिकांना त्यांच्या क्षेत्रातील ज्ञान निदर्शनास आणून देतात आणि त्यांच्या गरजा भागवू शकतात. या दृष्टीने ग्रंथसूची हे अभ्यासाचे आणि संशोधनाचे उपयुक्त साधन आहे.

**२) निर्देश** (Index) **:-**

या पध्दतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आंतरराष्ट्रीय आवृत्त्यांना संपूर्ण निर्देश असला तरी इंग्रजी आवृत्तीला संपूर्ण निर्देश नाही. या पध्दतीची संक्षिप्त सुधारित इंग्रजी आवृत्ती इ.स. १९६१ मध्ये प्रसिध्द झाली. या संक्षिप्त आवृत्तीं मधील निर्देश संज्ञांच्या वर्णक्रमानुसार असून तो सापेक्ष आहे. या निर्देशामध्ये सुमारे २०,००० नोंदींचा उल्लेख आहे. नवीन आवृत्त्यांमध्ये प्रमुख विषयाचे तक्ते व सबंधित निर्देश एकाच खंडात प्रसिध्द होत आहेत.

आंतरराष्ट्रीय कीर्तीची एक प्रमाणित पध्दत म्हणून या पध्दतीचा हजारो ग्रंथालयांमधून वापर होत आहे. या पध्दतीचा विशेष उपयोग माहिती केंद्रांमधून व शास्त्रीय विषयातील नियतकालिकांमध्ये प्रसिध्द होणाऱ्या लेखांचे गोषवारे वर्गीकृत करण्यासाठी केला जातो.

दोन विषयातील संशोधन व एकाच विषयातील निरनिराळे दृष्टिकोन व्यक्त करणे इत्यादी युक्त्यांनी ही पध्दत समृध्द आहे. या पध्दतीमधील तक्ते अत्यंत तपशीलवार तयार केलेले असल्याने विषयाचे सूक्ष्मतम वर्गीकरण करणे शक्य होते. ही पध्दती खऱ्या अर्थाने जागतिक आहे. या पध्दतीमधील सुधारणा निरनिराळ्या विषयतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व संपादक मंडळाच्या नेतृत्वाखाली होत असल्याने तिला बरेच स्थैर्य लाभले आहे.

**३) तालिका :-**

तालिका म्हणजे एखाद्या विशीष्ट ग्रंथालयात असलेल्या ज्ञानसाधनांची म्हणजे ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते, प्रबंध, नकाशे इत्यादींची यादी विशिष्ट नियामवलीनुसार केलेले असते. या यादीत पुस्तकांची सविस्तर माहिती, विषय लेखक, ग्रंथनाम, संपादक आवृत्ती, खंड प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष, पाने, आकार, किंमत इत्यादी माहिती दिलेली असते.

प्राचीन काळी पुस्तकांची संख्या फार कमी होती. तेव्हा पुस्तके/ग्रंथ हे मौल्यवान वस्तूंच्या रूपात संग्रहीत केले जात

असत. हे सर्व ग्रंथ बंद कपाटात ठेवले जात असत. त्या वेळी तालिकेमध्ये प्रत्येक ग्रंथाची विस्तृत नोंद केली जात होती. त्यालाच वर्णनात्मक सूची किंवा तालिका असे म्हणतात.

**४) डेटाबेस (Database) :-**

डेटा म्हणजे विचारलेल्या प्रश्नाला प्रतिसाद म्हणून वापरलेले चिन्ह किंवा खुणा होय. त्यांपासून आणखी चिन्हे (Symbols) निर्माण होऊ शकतात. अक्षरांच्या रूपातही ही चिन्हे असू शकतात. अनेक मार्गांनी डाटा गोळा करून विशिष्ट पध्दतीने संग्रहित केले जाते. त्यांच्या नोंदी केल्या जातात. उपयोजकापर्यंत त्याबाबत माहिती पोहचविली जाते व त्यांच्या गरजेनुसार त्यांना विशिष्ट डाटा पुरविला जातो. संचित डाटा ठेवण्यासाठी डेटाबेस आणि डेटा बँक या संज्ञा आहेत. काही वेळा एकाच अर्थाने त्या संज्ञा वापरलेल्या दिसतात तर काही वेळा त्यात सूक्ष्म फरकही केला जातो.

**५) नियतकालिक :-**

सभा व पत्रव्यववहार यामधून जे शास्त्रीय विचार व्यक्त होत असतात ते विचार अधिक शीघ्रतेने व्यक्त करण्यासाठी नियतकालिकाचे माध्यम वापरण्यात येऊ लागले. नियतकालिकातील माहिती अगदी अद्ययावत असते. तसेच ग्रंथापेक्षा त्याचे आगळे वेगळे महत्त्व असते. त्यामुळे वैज्ञानिक शोध आणि वैज्ञानिके नियतकालिके यांचे जे घनिष्ट नाते निर्माण झाले ते आजतागायत कायम आहे.

वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील कोणताही संशोधक आपला नवा शोध एकदम ग्रंथ रूपाने प्रसिध्द करत नाही नियतकालिकातच त्याचा शोध प्रथमच प्रसिध्द करतो. मुद्रण, बांधणी व विशिष्ट प्रसार यामुळे नियतकालिकात संशोधन प्रसिध्द करणे शक्य असते. नियतकालिक नियमित व जलद गतीने प्रसिध्द होत असल्याने संशोधनातील सुधारणा किंवा नवीन माहिती त्यांच्या समोर सलगतेने प्रसिध्द करता येते.

**६) प्रगतीचे आढावे (Prograssive Riviews) :-**

एखाद्या ज्ञान क्षेत्रात विशिष्ट कालावधीत झालेले प्रगतीचे आढावे साहित्यात आढळतात. प्रत्येक विषयावर प्रसिध्द होणारे साहित्य इतके असते की आपला व्यवसाय संभाळून ते सर्वच्या सर्व मिळून वाचणे दुरापास्त असते. ही अडचण ओळखूनच प्रगतीचा आढावा घेणारे साहित्य प्रचारात आले. विशिष्ट क्षेत्रात प्रसिध्द झालेल्या माहितीचे थोडेफार ज्ञान हवे असेल तर संशोधकाने मूळ शोध लेख न वाचता विषयावरील प्रगतीचे आढावे वाचणे आवश्यक ठरते.

**७) इंटरनेट (Internet) :-**

इंटरनेट ही माहितीचे दळणवळण करणारी संगणकीय यंत्रणा आहे. इंटरनेट हे ज्ञानाचा विश्वकोश आहे. इंटरनेच्या साह्याने कोणतीही माहिती कोणत्याही ठिकाणी पोहचविता येते. ई-मेल, वल्ड वाईल्ड वेब, इंटरनेट रिले चार्ट ही इंटरनेटची माहिती दालने आहेत. इंटरनेचटचे पत्रव्यवहार माहिती, दळणवळण, सॉफ्टवेअर, परचेसिंग, मार्केटिंग इ. फायदे आहेत. इंटरनेट या साधनातून तथ्य, माहिती, आकडेवारी, नकाशे, सारण्या, आलेख, तक्ते इ. प्राप्त केल्यावर संगणकाचा उपयोग E-Mail व्यतिरिक्त Electronic Questionnaire व Electronic Interviewing साठीही करता येता. इंटरनेटवरती इतकी माहिती उपलब्ध असते की त्यातून निवड करणे हे खडतर कार्य बनले आहे. मौलिक संशोधनासाठी अत्यंत दुर्मिळ किंवा अपर्यवेक्षीय तथ्य सामग्री इंटरनेटवर उपलब्ध होत नाही. त्यासाठी संशोधकाला व्यक्तिगत प्रयत्न करावे लागतात.

**८) ऑन लाईन सेवा -**

संगणकाद्वारे साठविलेल्या माहितीची सेवा दोन प्रकारे देण्यात येते. पहिल्या पध्दतीला ऑफ लाईन सेवा म्हणतात तर अद्ययावत पध्दतीला ऑनलाईन सेवा असे म्हणतात .

ऑन लाईन या संज्ञे मध्ये अनेक संकल्पना आहेत. शब्दशः अर्थ घेतला तर संशोधक त्याला हव्या असलेल्या डेटाबेसशी तसेच ज्या कंप्युटरवर तो डाटा साठविलेला आहे त्या कॉम्प्युटरशी प्रत्यक्ष संपर्क वा संवाद साधू शकतो. यासाठी एक संगणक, एक मोडेम, टेलिफोन कनेक्शन, इंटरनेट कनेक्शन, E-mail Address इत्यादींच्या मदतीने संशोधक आपल्याकडील संगणकाच्या टर्मिनल द्वारे टेलेक्स, टेलिफोन अथवा उपग्रहद्वारा दूरच्या डेटाबेसशी संपर्क साधू शकतो आणि कनेक्शन मिळाल्यानंतर माहितीचा शोध घेऊ शकतो.

**९) परिषदांचे अहवाल (Conference Procedings) :-**

सबंधित विषयावरील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यविभागीय स्तरावर सपंन्न झालेल्या परिषदा, कार्यशाळा, चर्चा सत्रांचे अहवाल (Proceedings of Conferences) संशोधनाच्या दृष्टीने, विशेषतः साहित्याचा आढावा घेण्याच्या दृष्टीने, उपयुक्त असतात. याची माहिती सबंधित विषयांची नियतकालिके, Newsletters, Bulletins, यामध्ये प्रामुख्याने मिळते.

**१०) संशोधन अहवाल (Research Reports) -**

संशोधन अहवाल, संस्थांचे अहवाल, प्रकाशने ही

संशोधनास उपयुक्त असतात. अशी प्रकाशने प्रामुख्याने विद्यापीठ ग्रंथालये, संशोधन संस्थांची ग्रंथालये या ठिकाणी उपलब्ध असतात. उदा. ICSSR Library Association, London, ची प्रकाशने या प्रकारात मोडतात तसेच संबंधित विषयाची Reviews of Literature, नियमित प्रकाशित होतात. यामध्ये विशिष्ट कालखंडात, विशिष्ट विषयामध्ये काय संशोधन झाले आहे याचीच माहिती दिली जाते असे साहित्य Advances या नावाने प्रकाशित होते. उदा. Advances in Librarianship, अशा स्वरूपाची प्रकाशने Academic Press London, यांची आहे. त्यांची अनेक विषयांची अशी प्रकाशने आहेत. केवळ एका खंडाच्या साह्याने विशिष्ट वर्षात जगात काय संशोधन झाले आहे याची महिती मिळते.

**११) लेखांची सूची (Index of Articles) -**

विविध माहिती केंद्रे, संस्था यांच्या मार्फत संशोधनास उपयुक्त लेखांच्या सूची तयार करून त्या नियमित प्रकाशित केल्या जातात. -

**I) Index India** - राजस्थान विद्यापीठामार्फत त्रैमासिकाच्या स्वरूपाची ही सूची प्रकाशित केली जाते. यात प्रबंधाची सूची भारतीय, परदेशीय नियतकालिकातील लेखांची सूची, वृत्तपत्रातील लेखांची सूची इ. माहिती दिलेली असते.

**II) Guide to Indian Periodical Literature :-** भारतातील अंदाजे ३०० नियतकालिकातील लेखांची सूची यात दिली जाते.

**III) Indian Press Index :-** यात भारतातील २५ इंग्रजी दैनिकातील लेख, संपादकीय, विशेष लेख यांची सूची दिलेली असते.

**IV) Documentation Fortnightly :-** भारतीय संसदेच्या ग्रंथालयात प्रात होणाऱ्या नवीन घटना, घडामोडीसंबंधी साहित्याची माहिती यात दिली जाते.

**V) Documentation of Asia Indian Council of World Affairs :-** या संस्थेमार्फत लेखांची विषयवार सूची दरवर्षी प्रकाशित केली जाते.

**VI) Indian Index Series : ICSSR च्या** National Social Scial Sciences Documentation Centre मार्फत विविध नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांची सूची प्रकाशित केली जाते.

**१२) सरकारी प्रकाशने (Government Publication) -**

शासकीय प्रकाशनांचे संशोधन प्रक्रियेतील महत्त्व उपयोग अनन्यसाधारण आहे. जी माहिती या प्रकाशनात मिळते ती तर कुठल्याच साहित्यात मिळत नाही. त्यादृष्टीने संशोधकाला अशी माहिती आवश्यकच असते. वेगवेगळे अहवाल यात प्रामुख्याने समित्या, आयोग यांचे अहवाल फार महत्त्वाचे असतात.

अशा प्रकारे संशोधन करत असताना संशोधकाने ग्रंथपालाचे मार्गदर्शन घेतले तर निश्चितच त्यांचे संशोधन कार्य चांगल्या प्रकारे पार पडते/पडेल.

❑ ❑ ❑

Readers are plentiful,
thinkers are rare.
*- Harriet Martineau*

*A democratic Society depends upon an informed and educated citizenry.*
*- Thomas Jefferson.*

# विद्यार्थी मंडळ : वरिष्ठ महाविद्यालय



प्रा.डॉ. विजय शेडगे
अध्यक्ष, विद्यार्थी मंडळ



सदाशिव नेहे
विद्यापीठ प्रतिनिधी



कु. निर्मला देवराम झोळेकर
टी.वाय.बी.ए., कला मंडळ प्रतिनिधी



तुषार चंद्रकांत पोखरकर
टी. वाय. बी. कॉम्, एन्. एस्. एस्. प्रतिनिधी



कु. प्रियंका बाळासाहेब घोडके
एल.आर., एस्. वाय. बी. ए.



अमित लक्ष्मण भोत
एफ्.वाय.बी.ए., एन्.सी.सी. प्रतिनिधी



कु. मधुमिता भारत आंबरे
एफ्.वाय.बी.बी.ए.



प्रविण नारायण आंबेकर
एस्.वाय.बी.ए. (अ)



पवार विजय नारायण
एस्.वाय.बी.ए., पॉलिटिक्स्



कु. राधिका प्रकाश गडाख
टी.वाय.बी.ए. (अ)



चेतन विष्णु साबळे
टी.वाय.बी.ए. (ब)



पतवा गिरीशकुमार रायकुमार
एफ्.वाय.बी.कॉम्.



कु. कोटकर रोहिणी राधाकृष्ण
एस्.वाय.बी.कॉम्.



घोसाळे राहुल अशोक
टी.वाय.बी.कॉम्.



कु. प्राजक्ता दत्ता शिरसाठ
एफ्.वाय.बी.सी. एस्.



कु. सुवर्णा सदाशिव कचरे
टी.वाय.बी.एस्सी. (रसायन)



कु. प्रतिभा बाबासाहेब पंडीत
टी.वाय.बी.एस्सी.



कु. मनिषा सुरेश कानवडे
एम्.ए., हिंदी.



कु. सविता विलास नवले
एम्.ए., पॉलटिक्स



ज्ञानेश्वर मदन साबळे
एफ्.वाय.बी.सी.ए.



कु. सिमा बाळासाहेब देशमुख
एस्.वाय.बी.सी.ए.

## विद्यार्थी मंडळ : कनिष्ठ महाविद्यालय


प्रा. ओंकार राठी
अध्यक्ष


चव्हाण प्रमोद
११ वी कला (अ)


कोंडावळे प्रदिप
११ वी कला (ब)


कु. मुंढे भोराबाई
११ वी कला (क)


झोडगे किरण
११ वी कला (ड)


कु. वाकचौरे रेशमा
११ वी वाणिज्य (अ)


कु. अस्वले योगिता
११ वी वाणिज्य (ब)


कु. देशमुख अनुजा
११ वी विज्ञान (अ)


कु. शिंदे अर्चना
११ वी विज्ञान (ब)


वाकचौरे अक्षय
११ वी विज्ञान (क)


कु. बंगाळ सुप्रिया
१२ वी कला (अ)


कु. गोडे प्रियंका
१२ वी कला (ब)


कु. शेणकर सारिका
१२ वी कला (क)


कु. वाजे सविता
१२ वी कला (ड)


हुजबंद स्वप्निल
१२ वी वाणिज्य (अ)


कुमकर राहूल
१२ वी वाणिज्य (ब)


कु. बुब प्राची
१२ वी विज्ञान (अ)


कु. वाकचौरे स्वप्नाली
१२ वी विज्ञान (ब)


कु. देशमुख प्रगती
१२ वी विज्ञान (क)


कु. आरोटे स्वप्नाली
१२ विज्ञान (अ)


बोडके प्रदिप
रा. से. योजना प्रतिनिधी
१२ वी विज्ञान (अ)


नवले किरण
क्रीडा प्रतिनिधी
१२ वी वाणिज्य (अ)


वाकचौरे संतोष
एन्.सी.सी. प्रतिनिधी
१२ वी कला


कु. देशमुख सोनाली
एल्. आर.
१२ वी विज्ञान (अ)

## विद्यार्थी मंडळ : उद्‌घाटन व कार्यक्रम



विद्यार्थी मंडळ उद्‌घाटन सोहळ्यासाठी उपस्थित मान्यवर
(डावीकडून मा.श्री. मधुकरराव पिचड साहेब,
मा.श्री. वसंतरावजी पवार, मा.श्री. आंबरे पाटील)



स्वागतगीत व विद्यापीठ म्हणतांना विद्यार्थिनी



पुणे विद्यापीठ सिनेट सदस्यपदी निवड झाल्याबद्दल
मा. प्राचार्यांचा सत्कार करतांना मा. वसंतरावजी पवार



विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांना शपथ देतांना



उपस्थितांना मार्गदर्शन करतांना
प्रमुख पाहुणे मा. वसंतरावजी पवार



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे
प्रमुख विश्वस्त मा.ना. मधुकररावजी पिचड साहेब



उपस्थितांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे
विश्वस्त मा. प्रेमानंदजी रुपवते साहेब



उपस्थितांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे
अध्यक्ष मा. आंबरे पाटील

# विद्यार्थी मंडळ : उद्‌घाटन व कार्यक्रम



विद्यार्थी मंडळ उद्‌घाटन समारंभ प्रसंगी आभार
मानतांना विद्यापीठ प्रतिनिधी सदाशिव नेहे



विद्यार्थी मंडळामध्ये पारंपारिक दिन साजरा झाला त्यानिमित्त
सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतांना
मा.ना. मधुकररावजी पिचड साहेब व मा. आंबरे पाटील



ग्रंथ दिंडीचे पूजन करतांना
मा. ना. पिचड साहेब व इतर मान्यवर



पारंपारिक दिनानिमित्त उपस्थितांना मार्गदर्शन
करतांना मा.ना. मधुकररावजी पिचड साहेब



वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन करतांना संस्थेचे खजिनदार
मा. के. बी. हांडे साहेब, कला मंडळाचे चेअरमन मा. आर.जी. देशमुख सर
विद्यार्थी मंडळाचे चेअरमन प्रा.डॉ. विजय शेडगे व शिक्षकवृंद



"Best Student of the year" चे मानचिन्ह
स्वीकारल्यानंतर सदाशिव नेहे व इतर मान्यवर



पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे
मा. (निवृत्त) ले.जनरल श्री. शेकटकर साहेब - श्रोतवर्गास उद्‌बोधित करतांना



विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष प्रा. शेडगे
बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर करतांना.

## माहिती तंत्रज्ञान विभाग : प्रयोगशाळा उद्घाटन (१३/०८/२००८)



माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन करतांना
मा. मधुकरराव पिचड साहेब, मा. प्राचार्य, मा. वसंतरावजी पवार व इतर
(लेडीज होस्टेल उद्घाटन)



माहिती तंत्रज्ञान प्रयोग शाळेचे उद्घाटन करतांना माजी
प्राचार्य कऱ्हाडकर सर, वसंतरावजी पवार,
मा. प्राचार्य, मा. डॉ. बी. जी. बंगाळ व इतर





संगणक प्रयोगशाळेची माहिती घेतांना
मा. मधुकररावजी पिचड साहेब, मा. पवार साहेब, मा. जे. डी. आंबरे पाटील, मा. प्राचार्य व इतर



बी.बी.ए., बी.सी.ए., बी. सी. एस. पालक मेळाव्यात
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. प्राचार्य व व्यासपीठावर
मा. हमीदभाई फारूकी साहेब, मा. कल्पनाताई सुरपुरिया



दिनांक २३/०१ /२००९ बी.बी.ए., बी.सी.ए., बी. सी. एस.
पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
मा. हमिदभाई फारूकी साहेब व व्यासपीठावर मा. के.डी. हांडे साहेब व इतर



दिनांक २३/०१ /२००९ बी.बी.ए., बी.सी.ए., बी. सी. एस.
पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पालक व
व्यासपीठावर मा. के. बी. हांडे साहेब, फारूकी साहेब व इतर



दिनांक २३/०१ /२००९ बी.बी.ए., बी.सी.ए., बी. सी. एस.
पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पालक
व व्यासपीठावर मा. हांडे साहेब, मा. फारूकी साहेब व इतर.

## प्रवेश परीक्षा शिबीर व सत्कार



NHT - CET प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबीर विद्यार्थी व पालक
डीपर पुणे - सचिव श्री. हरिष बुटले, मा. प्रा. रमेशचंद्र खांडगे,
उपप्राचार्य प्रा. गोरक्ष शिरसाठ, प्रा. संजय ताकटे ,विवेक वाकचौरे,
बाबासाहेब शेवाळे.



NHT - CET प्रवेश परीक्षा
यशस्वी - कु. बोरसे सारिका सत्कार करतांना पालकांसमवेत
मा. प्राचार्य, हामीदभाई फारूकी, प्रा. ताकट

## राष्ट्रीय सेवा योजना : कनिष्ठ महाविद्यालय



रा.से.यो. विशेष हिवाळी शिबीर (+२ स्तर) उद्घाटन समारंभ - अ.ता. ए. सोसा. चे अध्यक्ष
मा. जे. डी. आंबरे पाटील, खजिनदार मा.ॲड. हांडे साहेब, उपप्राचार्य मा. गोरक्ष शिरसाठ, पर्यवेक्षक मा.डॉ. भास्करराव खांडगे,
सुगांव ग्रामस्थ व विविध संस्थांचे पदाधिकारी.



रा.से.यो. विशेष हिवाळी शिबीर (+२ स्तर)
अ.ता.ए.सोसा.चे अध्यक्ष मा. जे. डी. आंबरे पाटील
शिबिरार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना.



रा.से.यो. विशेष हिवाळी शिबीर (+२ स्तर)
सुगांव बु।।, ता. अकोले राष्ट्रीय सेवा योजनेच्या
स्वयंसेवकांचे श्रमदान.

## वाणिज्य मंडळ : उद्घाटन व कॉमर्स फेस्टिवल



उद्घाटक मा.श्री. वंदन नगरकर – पुणे,
अध्यक्ष – मा.श्री. सुरेशराव कोते (पुणे)
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे सर व अ.ता.ए.सोसायटीचे पदाधिकारी.



वाणिज्य मंडळ, उद्घाटन सोहळा
उद्घाटक : मा. सुरेशराव कोते व स्टाफ सहकारी
दि. १५/०९/२००८



कॉमर्स फेस्टिव्हल उद्घाटक : मा.डॉ. शरद कोलते सर, अहमदनगर,
अध्यक्ष मा. जे. डी आंबरे पाटील सत्कार करतांना
चेअरमन प्रा. आर. जी. देशमुख दि. २८/१२/२००८




कॉमर्स फेस्टिव्हल मा.डॉ. शरद कोलते सर
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना. २८/१२/२००८



कॉमर्स फेस्टिव्हल
विद्यार्थी व प्राध्यापक श्रोत्यांच्या भूमिकेत २८/१२/२००८



कॉमर्स फेस्टिव्हल
मा.श्री. नंदकुमार पैठणकर (शाखाधिकारी, एस्.बी.आय.अकोले)
मार्गदर्शन करतांना 'बँका व स्पर्धा परीक्षा' २८/१२/२००८

## वाणिज्य मंडळ : उद्‌घाटन व कॉमर्स फेस्टिवल



मा.श्री.डॉ. विनायक गोविलकर, नाशिक यांचे स्वागत करतांना
११ वी कॉमर्स मधील विद्यार्थिनी २९/१२/२००८




मा. विनायक गोविलकरांचा परिचय
करतांना प्रा. आर.जी देशमुख २९/१२/२००८



मा.श्री. उत्तमराव जगधने (अध्यक्ष, Licworkers Fedration of India )–
सत्कार मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे सर
(जुन्या आठवणी ताज्या झाल्या) ३०/१२/२००८




मा.श्री. उत्तमराव जगधने – मार्गदर्शन करतांना
मा. नंदकुमार रासने, प्राचार्य, प्रा. आर. जी . देशमुख व
यु. आर. सदाशिव नेहे दिनांक ३०/१२/२००८



ध्यानात हरवलेले विद्यार्थी– मन:शांतीचा प्रयत्न



सांस्कृतिक कार्यक्रमातील एक भाव मुद्रा कुमार वाघमारे ११ वी कॉमर्स
'हे जीवन सुंदर आहे' – चेअरमन आर. जी. देशमुख